**इथून पुढे आठ दिवस कोणीही आपला रक्तदाब वाढवून घेवू नका, सट्टेबाजांरानी कमळावर भाव वाढ करुनही सट्टा बाजारात सट्टा लागेना**

**निवडणूकीत पैसे घेणाऱ्यांचे आता हळूहळू काळीज धडधडू लागले, २१ तारखेला त्यांनी घेतलेल्या पैशांचा हिशोब पराभूत उमेदवार चुकता केल्याशिवाय राहणार नाही**

# सट्टा बाजारात मोठी तेजी, तुतारीला सर्वात जास्त पसंती

**नगराध्यक्षासह नगरसेवक पदाच्या उमेदवारांचे रक्तदाब खालीवर होवू लागले अनेकजण एमडी डॉक्टरकडे जावून रक्तदाब चेक करू लागले**

वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-शनिवार दि.१३ डिसेंबर २०२५ पाने ४ किंमत ३

# स्व.संतोष देशमुख यांच्या निर्घृण मारहाणीचे २३ व्हिडिओ कोर्टात सादर

Email:- dailydivyawarta@Gmail.com

Email:-editordivyawarta@gmail.com

दिव्य वार्ता

## संपूर्ण हत्याकांडात मुख्य सुत्रधार वाल्मिक कराडच,१६ डिसेंबरला पुढील सुनावणी

बीड, (दिव्य न्युज):-संपूर्ण राज्याला हादरवून टाकणाऱ्या संतोष देशमुख हत्याप्रकरणाची शुक्रवारी उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात सुनावणी झाली. या सुनावणीवेळी सरकारी पक्षाने वाल्मिक कराड आणि त्याच्या साथीदारांनी संतोष देशमुख यांची कशाप्रकारे निर्घृणपणे हत्या केली, याचे पुरावे न्यायाधीशांसमोर सादर केले. ▸▸ पान २ वर

## स्व.संतोष देशमुखांच्या पत्नी अन् भावाला अश्रु अनावर

मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजी नगर खंडपीठात त्याच्या जामीन अर्जावर शुक्रवारी सुनावणी झाली. या सुनावणीसाठी मयत सरपंच संतोष देशमुख यांच्या पत्नी अश्विनी देशमुख आणि त्यांचे बंधू धनंजय देशमुख हजर होते. कोर्टामध्ये सुमारे ▸▸ पान २ वर

# अमर नाईकवाडे सारखा काम करणारा माणूस पडला तर लोकांचा विश्वास उडेल : विलास विधाते

## अमृत सारडांनी विधानसभा,लोकसभा लढवावी



बीड , (दिव्य न्युज):- काम करणारी माणसं मतदारांनी जपायला हवी, स्थानिक पातळीवर काम करणारा अमर नाईकवाडे यांच्यासारखा कार्यकर्ता नाही. असे काम करणारे कार्यकर्ते निवडणुकीत पडले तर शहरात चुकीचा मेसेज जाईल आणि प्रमाणीकपणे काम करणारी माणसं राजकारणात येणार नाहीत, तसेच अमृत सारडा मनाने, धनाने श्रीमंत आहेत. त्यांचा मी फॅन आहे परंतु त्यांनी विधानसभा,लोकसभा लढवावी आणि नगरपरिषद निवडणुकीत अमर नाईकवाडे हेच फिट बसताता असे मत विलास विधाते यांनी एका मुलाखतीत व्यक्त केले आहे.

बीड शहरातील प्रभाग क्रमांक ३ ची निवडणूक सुरू असून, येत्या २० तारखेला यासाठी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. येथून अमर नाईकवाडे आणि अमृत सारडा असे दोन दिग्गज उमेदवार आमनेसामने आहेत. याच पोर्शभूमीवर बीड येथील एका दैनिकाने जेष्ठ नगरसेवक विलास विधाते यांची मुलाखत घेतली, यामध्ये त्यांनी आता राजा का बेटा राजा नाही तर ज्याच्याकडे ▸▸ पान २ वर

# रस्ते रुंदीकरण अन् मावेजा प्रश्नी आ. संदीप क्षीरसागर यांनी घेतली गडकरींची भेट

## महत्वाच्या रस्त्यांची केली मागणी



बीड, (दिव्य न्युज):- बीड विधानसभा मतदारसंघातील रस्त्यांचे रुंदीकरण, मजबुतीकरण तसेच शेतकऱ्यांचा मावेजा वाटप हे महत्त्वाचे प्रश्न सोडविण्यासाठी आ. संदीप क्षीरसागर यांनी केंद्रीय वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेतली. नागपूर येथे सध्या राज्याचे हिवाळी अधिवेशन सुरू असून, यावेळी वेळ काढून आ. संदीप क्षीरसागर यांनी बीड मतदार ▸▸ पान २ वर

# अलहुदा उर्दू शाळेच्या तीन शिक्षकांची ३०७ प्रकरणातून निर्दोष मुक्तता

## शाळेतील अंतर्गत वादातून दाखल खोटा गुन्हा न्यायालयात कोसळला





बीड, (दिव्य न्युज):- अलहुदा उर्दू प्राथमिक शाळा , बीड येथील तीन शिक्षकांवर डिसेंबर २०१५ मध्ये दाखल करण्यात आलेला गंभीर फौजदारी कलम ३०७, ३२३,४२७, ५०६, ३४ कलमांचा गुन्हा अखेर न्यायालयात टिकू शकला नाही. दहा वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या प्रकरणात तिन्ही शिक्षकांना मा .जिल्हा प्रधान न्यायाधीश बीड यांनी निर्दोष मुक्तता केली.याबाबत अधिक माहिती अशी की, अलहुदा उर्दू प्राथमिक शाळा,बीड ही शाळा नूर एज्युकेशनल अँड वेल्फेअर ▸▸ पान २ वर

## गंगाखेड-परळी मार्गावर ऑटोरिक्षा उलटला

# चालक बचावला, पण शेजारचा प्रवासी ठार



परळी , (दिव्य न्युज):- गंगाखेड येथे लग्नाच्या समारंभातून आनंदाने परळीला परतणाऱ्या राऊत कुटुंबावर काळाने घाला घातला. गंगाखेड-परळी मार्गावरील निळा पाटी परिसरात ऑटोरिक्षा उलटून झालेल्या अपघातात परळी शहरातील बबनराव राऊत (वय ६०) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे परळी शहरात शोककळा पसरली आहे.

परळी शहरातील सुभाष चौक येथे बबनराव राऊत हे केश कर्तनालयाचे दुकान चालवत होते. सामाजिक आणि व्यावसायिक वर्तुळात ते परिचित होते. शुक्रवारी ▸▸ पान २ वर

# सेवानिवृत्त एसटी कर्मचारी एम.एन.बेग उर्फ असद मिर्झा याचे निधन



बीड , (दिव्य न्युज):- शहरातील अख्तर नगर, गांधी नगर भागातील रहिवाशी आणि एसटी महामंडळातील सेवानिवृत्त कर्मचारी मिर्झा नियामत उल्ला बेग उर्फ असद मिर्झा यांचे आज पहाटे निधन झाले. मृत्यूसमयी ते ७० वर्षांचे होते. एकेकाळी कॉम्रेड चळवळीचे नेते म्हणून त्यांची ओळख होती. एसटी महामंडळ संघटनेचे राज्य महासचिव म्हणून त्यांनी काम केलेले आहे. एम.एन.बेग उर्फ असद मिर्झा बेग यांचा दफनविधी आज दि.१३ डिसेंबर पान २ वर

## १७ जुलै २०२५ रोजी आव्हाड-पडळकरांचे कार्यकर्ते विधिमंडळ लॉबीत भिडले

# दोन आमदारांच्या मस्तवाल कार्यकर्त्यांना विधिमंडळाकडून दोन दिवसांची कैद

### विधानमंडळ विशेषाधिकार समितीचा महत्त्वाचा निर्णय

### २०२९ पर्यंत मुंबई, नागपूर विधानभवन प्रवेशास बंदी

### हाणामारीच्या प्रकरणामध्ये पहिल्यांदाच कैदेची कारवाई

नागपुर, (दिव्य न्युज):- १७ जुलै २०२५ रोजी भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांच्या कार्यकर्त्यांत मुंबई विधिमंडळ लॉबीत, पायऱ्यांवर तुफान हाणामारी झाली होती. या प्रकरणी पडळकर समर्थक कार्यकर्ते सर्जेराव टकले, आव्हाड समर्थक नितीन देशमुख यांना विधानमंडळ विशेषाधिकार समितीने दोन दिवस कैदेची (दिवाणी कोठडी) शिक्षा ठोठावली. या दोघांना २०२९ पर्यंत मुंबई, नागपूर विधानभवन परिसरात बंदी घालण्यात आली आहे. समितीने दहा बैठकांत ३० जणांचे जाब-जबाब तसेच साक्षी-पुरावे नोंदवल्यावर हा निर्णय घेतला.

राज्यातील सर्व शेतापर्यंत बारमाही मजबूत रस्ते बांधण्याची योजना येत्या ४ वर्षांत राबवली ▸▸ पान २ वर



### समितीच्या महत्त्वाच्या शिफारशी

१ विधानभवन प्रवेश नियमावलीत सुधारणा : विधान भवनात येणाऱ्या सर्व अभ्यागतांसाठी एक स्वतंत्र आणि कठोर नियमावली तातडीने तयार करून तिची कडक अंमलबजावणी करावी.

२ तंत्रज्ञान-आधारित तपासणी : विधान भवन इमारतीमधील प्रवेशिका वितरण प्रणाली महाराष्ट्र पोलीस डेटाबेसशी थेट संलग्न करण्यात यावी. या संलग्नतेमुळे अभ्यागतांची गुन्हेगारी पार्श्वभूमीची तपासणी स्वयंचलितरित्या कार्यान्वित होईल.

३ प्रभावी सुरक्षा व्यवस्थेची निर्मिती : सुरक्षा व्यवस्था बळकटीसाठी सुरक्षा सल्लागार, पोलीस विभागाशी समन्वय ठेवला जावा. आणि गुन्हेगारी प्रवृत्तींना रोखावे.

# धुळे-सोलापूर महामार्गावर प्रवाशांना लुटणारी अट्टल टोळी गजाआड

## सहा जणांची टोळी, एमजी हेक्टरमधून कोयता, रॉडसह फिरायची, पाठलाग करून तिघांना बेड्या ठोकल्या, चार गुन्हे उघडकीस



बीड , (दिव्य न्युज):- धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर प्रवाशांची वाहने अडवून, काचा फोडून शस्त्राचा धाक दाखवून दरोडा आणि जबरी चोरी करणाऱ्या सराईत टोळीला बीड स्थानिक गुन्हे शाखेने अटक केली आहे. या कारवाईमुळे महामार्गावरील एक दरोड्याचा आणि तीन जबरी चोरीचे असे एकूण चार गंभीर गुन्हे उघडकीस आले आहेत.

पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांच्या आदेशानुसार, महामार्गावरील गुन्हे उघडकीस आणण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेचे विशेष पथक तयार करण्यात आले होते. पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर यांच्या पथकाला ११.१२.२०२५ रोजी सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त माहितीद्वारे आरोपी कळंब, जि. धाराशिव येथून केजच्या दिशेने येत असल्याची माहिती मिळाली. या माहितीनंतर पथकाने तातडीने नाकाबंदी लावली. आरोपींनी पोलिसांना पाहून गाडी न थांबवता पुढे पळून जाण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी पाठलाग करून गुन्हेगारांना त्यांच्या एमजी हेक्टर कारमधून ताब्यात घेतले. सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर आणि स्थानिक गुन्हे शाखा, बीडचे पो.नि. शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर, पोलीस हवालदार सोमनाथ गायकवाड, मुन्ना वाघ, राहुल दशांदे, बाळूसानप आणि पोलीस अंमलदार अर्जुन यादव, आषपाक सय्यद, मनोज परजणे, अंकुश वरपे, आनंद मस्के, स्वाती मुंडे, विकी सुरवसे, तसेच वाहन चालक नितीन वडमारे यांनी मिळून केली आहे.

### घडलेल्या प्रमुख घटना

१ - दि. ०४.१२.२०२५, वडगाव ढोक (ता. गेवराई): रस्त्यावर जॅकेट घालून गाडी अडवून बाहेरील राज्यातील प्रवाशांना लुटून मारहाण करून सोने व रोख रक्कम चोरली. (पो. स्टे. गेवराई, गु.र.नां ७१४/२०२५)

२ - दि. २५.०९.२०२५, संभाजी महाराज चौक (बीड): पहाटे ५ वाजता चालक झोपले असताना वाहनाजवळ येऊन गाडीची काच फोडली, आत बसलेल्या प्रवाशांना मारहाण करून सोने-चांदीचे दागिने हिसकावून चोरले. (पो. स्टे. बीड ग्रामीण, गु.र.नां ३१६/२०२५)

३ - दि. २०.११.२०२५, हॉटेल दुबई समोर: गाडी पार्क करून झोपलेल्या प्रवाशांच्या गाडीची काच रॉडने फोडून, शस्त्राचा धाक दाखवून मौल्यवान वस्तू चोरल्या. (पो. स्टे. बीड ग्रामीण, गु.र.नां ४०२/२०२५)४ - दि. ०९.११.२०२५, धनवडे वस्ती (पाली): रात्री आयआरबी पार्किंग एरियाजवळ वाहन अडवून शस्त्राचा धाक दाखवून खिशातील रोख रक्कम बळजबरीने काढून घेतली. (पो. स्टे. बीड ग्रामीण, गु.र.नां ४१७/२०२५)अटक केलेले आरोपी (सर्व रा. मकरवाडी, ता. वाशी, जि. धाराशिव)

ताब्यात घेतलेल्या आरोपींची नावे खालीलप्रमाणे आहेत: १. राहुल अनिल काळे (वय १९ वर्षे) २. विकास अनिल काळे (वय २१ वर्षे) ३. अनिल राम काळे (वय ४० वर्षे) या आरोपींनी त्यांचे साथीदार सुनील हिरमन दशांदे, सचिन ऊर्फ आवडया राम काळे आणि बबलू शिव दशांदे (सर्व रा. मकरवाडी) यांच्यासह मिळून वरील चारही गुन्हे केल्याची कबुली दिली आहे.

### गुन्ह्यात वापरलेले साहित्य जप्त

आरोपींकडून काळ्या रंगाची विना नंबरची एमजी हेक्टर कार, तसेच वाहनाच्या डिक्कीमध्ये असलेले एक कोयता आणि लोखंडी रॉड जप्त करण्यात आले आहेत. अटक केलेल्या तिन्ही आरोपींना १२.१२.२०२५ रोजी गुन्ह्यात अटक करण्यात आली असून, पुढील तपास पोलीस ठाणे गेवराईचे सपोनि अण्णासाहेब पवार हे करत आहेत.

पान ४ वरून

## जायकवाडी उत्तर

करण्यात आले ,आरोग्य सेवेचा दर्जा उंचविण्यासाठी आपण सर्व मिळून अधिक प्रभावीपणे काम करू असा विश्वास व्यक्त केला. या बैठकीसाठीआरोग्य विभागाचे सचिव डॉ विनूप विनायक, आरोग्य सचिव ई. रविद्रन, आरोग्य संचालक डॉ नितीन आंबेडकर, संचालक डॉ विजय कंदेवाड, नागपूर विभागाचे उप संचालक डॉ शंशीकांत शंभरकर, नागपूर विभागातील जिल्हा आरोग्य अधिकारी , जिल्हा शल्य चिकित्सक,तालुका आरोग्य अधिकारी तसेच सर्व जिल्हास्तरीय कॉर्डिनेटर या बैठकीस उपस्थित होते.

## जनावरांनाही

जनावरे उघड्यावर बांधू नका. मोकाट सोडू नका. पशुमेळावे टाळा. पिण्यास थंड पाणी देऊ नका. निवाऱ्यात ओलसरपणा व धूर टाळा. मृत जनावरांचे शव कुरणावर अथवा चरावयाच्या मार्गात टाकू नका. स्थलांतर करणाऱ्या व रानात शेळी-मेंढी बसवणाऱ्या पशुपालकांनी विशेष खबरदारी घ्यावी. ऊबदार आच्छादने लपेटावीत. कर्बोदकयुक्त खाद्य प्राधान्याने द्यावे. मेंढ्यांची लोकर कापणी थांबवावी. लसीकरण करावे. आवश्यक औषधी व जीवनसत्त्वांचा साठा ठेवावा. कोंबडी शेडमध्ये दोन्ही बाजूच्या जाळ्यांना पडदे लावून रात्री व पहाटे थंड हवेच्या वेळी बंद करावे. उन्हाच्या वेळी पडदे उघडावेत. आहारात इलेक्ट्रोलाइटस, जीवनसत्वे, आदींचा वापर करावा.

## शेतकरी पुत्रांच्या

- रुपये

क्विंटल भाव द्या अशी मागणी शेतकरी पुत्रांनी केली आहे. तसेच कापूस, तुर, सोयाबीन, हरभरा या पिकांसाठी शासकीय खरेदी केंद्र तात्काळ सुरू करावेत. खरेदी प्रक्रिया पारदर्शक व सुरळीत करावी शेतमालाला उत्पादन खर्च अधिक ५० टक्के नफा गृहीत धरून बाजार भाव द्यावा. जंगली जनावरांचा बंदोबस्त तात्काळ करावा या व इतर मागण्यांसाठी या २५ डिसेंबर २०२५ च्या मोर्च्याचे आयोजन केले असून जिल्ह्यातील बाधित शेतकऱ्यांनी हजारोंच्या संख्येने या मोर्चाला छत्रपती शिवाजी महाराज पुतळा चौकात हजर राहावे असे आवाहन प्रा. सुशीलाताई मोराळे यांनी केले आहे.

# उत्तर दिले नाही तर उद्या मुख्य सचिवांवर हक्कभंग आणणार

## सुधीर मुनगंटीवारांच्या मुद्द्यावर राहुल नार्वेकरांचा इशारा

मुंबई (दिव्य न्युज):- राज्याच्या विधीमंडळाचे अधिवेशन संपत आले तरी सदस्यांनी मांडलेल्या अनेक लक्ष्यवेधी सूचनांची उत्तर अद्याप प्रलंबित आहेत. त्यावरुनच भाजपचे आमदार सुधीम मुनगंटीवारांनी चिंता व्यक्त केली. त्यानंतर विधानसभा अध्यक्षांनीही त्याला प्रतिसाद देत कारवाईचा इशारा दिला. उद्या सभागृहाची बैठक संपेपर्यंत जर लक्ष्यवेधींची प्रलंबित उत्तरं दिली नाहीत तर मुख्य सचिवांवर हक्कभंगाचा प्रस्ताव आणला जाईल असा इशारा राहुल नार्वेकरांनी दिला.



माजी मंत्री आणि भाजपचे आमदार सुधीर मुनगंटीवारांनी लक्ष्यवेधींच्या प्रलंबित मुद्द्यांचा प्रश्न सभागृहात मांडला. काही लक्ष्यवेधी या सभागृहात मांडल्या जातात तर काही लक्ष्यवेधींची उत्तरं ही शेवटच्या दिवशी सभागृहाच्या पटलावर ठेवली जातात अशी प्रथा आहे. पण गेल्या काही अधिवेशनापासून ही प्रथा दिसत नाही असं सुधीर मुनगंटीवारांनी निदर्शनास आणून दिलं.

सुधीर मुनगंटीवार म्हणाले की, विधानसभा अध्यक्षांनी या आधी ३० सप्टेंबर रोजी मुख्य सचिवांना एक पत्र लिहिलं होतं. त्यानुसार १२९ लक्ष्यवेधी सूचनांची निवेदनं प्राप्त आहेत. ३२९ स्वीकृत लक्ष्यवेधींपैकी २९२ निवेदनं प्राप्त आहेत. उर्वरित लक्ष्यवेधींची उत्तरं देण्यात आली नाहीत.सुधीर मुनगंटीवार यांनी मांडलेल्या मुद्द्यावर बोलताना विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर म्हणाले की, सुधीर मुनगंटीवारांनी मांडलेला मुद्दा अगदी योग्य आहे. कोणत्याही अधिकाऱ्याला जर असं वाटत असेल की विधीमंडळाच्या पीठासन अधिकाऱ्याने जर दिलेले निर्देश पाळणे बंधनकारक नाही, तर त्यावर कारवाई केली जाईल. उद्या सभागृहाची बैठक संपेपर्यंत जर सभागृहाच्या पटलावर प्रलंबित लक्ष्यवेधींची उत्तरं आली नाहीत तर मुख्य सचिवांवर हक्कभंगाची कारवाई केली जाईल.

पान १ वरून

## स्व.संतोष देशमुख

यावेळी संतोष देशमुख यांना सुदर्शन घुले, विष्णू चाटे आणि त्याच्या साथीदारांनी कशा पद्धतीने मारले, याचे व्हिडीओ न्यायालयात दाखवण्यात आले. सुदर्शन घुले आणि त्याच्या साथीदारांनी संतोष देशमुख यांना मारहाण केल्यानंतर त्यांच्या तोंडात लघवी केली होती. या सगळ्याचे व्हिडीओ उच्च न्यायालयात दाखवण्यात आले. ही सुनावणी सुरु असताना संतोष देशमुख यांची पत्नी आणि भाऊ धनंजय देशमुख हेदेखील न्यायालयात होते. संतोष देशमुख यांना मारहाण करतानाचे हे व्हिडीओ पाहून या दोघांना रडू कोसळले.

बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याकांडामध्ये वाल्मीक कराड हाच मुख्य सूत्रधार असल्याचा युक्तिवाद मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठातील मुख्य सरकारी वकिलांनी केला. हत्याकांडाशी संबंध नसून गोवण्यात आल्याचा युक्तिवाद करत वाल्मिक कराडच्यावतीने खंडपीठात जामीन अर्ज दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाची उर्वरीत सुनावणी १६ डिसेंबर रोजी होणार आहे.सर्वोच्च न्यायालयाच्या मिहीर शहा निवाड्यानुसार आरोपीला अटकेची कारणे लेखी देणे बंधनकारक असताना वाल्मिक कराडला कारणे दिलेली नाही, मोक्का कायदा चुकीच्या पद्धतीने लावला गेला आहे आणि देशमुख हत्याकांडात कराडचा संबंध नसून तो घटनेच्या दिवशी शेकडो किलोमीटर दूर होता. त्याला प्रकरणात गोवल्याचा युक्तिवाद बचाव पक्षाच्या वतीने करण्यात आला. त्यावर ड. अमरजितसिंह गिरासे यांनी प्रत्येक तारखेनुसार घटनाक्रम तपशीलवार उलगडून दाखवला. या घटनेतील साक्षीदार, मोबाईल फोन संवादाच्या तपशीलाचा (सीडीआर) अहवाल, सीसीटीव्ही फुटेज, ध्वनिफित मुद्रण, न्यायवैद्यक प्रयोगशाळेचा अहवाल न्यायालयात दाखविण्यात आला. या सगळ्या पुराव्यांवरुन वाल्मिक कराड हाच मुख्य सूत्रधार असल्याचा युक्तिवाद गिरासे यांनी केला.

## पत्नी अन् भावाला अश्रु

साडेसहा तास या प्रकरणाचा युक्तिवाद चालला. वाल्मिक कराड या प्रकरणात कसा दोषी आहे, हे सांगण्यासाठी सरकारी पक्षाने सुरुवातीपासूनचे सगळे पुरावे सादर केले. संतोष देशमुख यांना अमानुषपणे मारहाण करतानाच्या २३ व्हिडीओ क्लिप लॅपटॉपच्या माध्यमातून कोर्टासमोर सादर करण्यात आल्या. आजपर्यंत या व्हिडीओ क्लिपपासून हे कुटुंब दूर होतं. परंतु हायकोर्टात सगळे पुरावे सादर झाले. कोर्टासमोर जे दाखवलं जात होतं, ते पाहून अश्विनी देशमुख कोर्टरुमच्या बाहेर गेल्या आणि मोठमोठ्याने रडायला लागल्या. पाठोपाठ धनंजय देशमुखही बाहेर गेले आणि ओक्साबोक्सी रडायला लागले. या प्रसंगाने सगळेच हादरुन गेले. सरकारी वकील अमरजितसिंह गिरासे हे कोर्टासमोर पुरावे सादर करीत होते.

## सेवानिवृत्त एसटी

रोजी सायं.६ वाजता (मगरीबच्या नमाजनंतर) शहेंशाहवली दर्गाह परिसरातील क्रबस्तानमध्ये करण्यात येणार आहे.असद मिर्झा बेग यांच्या पश्चात पत्नी, चार मुले, एक मुलगी असा परिवार आहे. उर्दु दै.अलहिलाल टाईम्स आणि दै.संघर्षचे संपादक खमरूल इमान यांचे ते मामा होते. बेग कुटूंबियांच्या दु:खात सायं.दै.दिव्य वार्ता, कश्मकश परिवार सहभागी आहे.

## रस्ते रुंदीकरण

संघातील खरवंडी ते नवगण राजुरी रस्ता विस्तारिकरण आणि मजबूतीकरण करणे, शेतकरी बांधवांना भुसंपादनाचा मावेजा देण्यात यावा तसेच आर्वी- पाडळी- नागऱ्याचीवाडी फाटा या रस्त्याच्या विकासासाठी निधी देण्यात यावा या मागणीचे केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन निवेदन दिले. या उपस्थित केलेल्या सर्व विकास कामांच्या बाबतीत मंत्री महोदयांनी सकारात्मकता दर्शविली आहे. अशी माहिती आ. संदीप क्षीरसागर यांनी दिली. यामुळे आ. संदीप क्षीरसागर यांचे मतदारसंघातील विकासावर लक्ष असल्याचे दिसून येत असून, त्यांची सर्व समस्या सोडवून मतदारसंघातील जनतेला दिलासा देण्याची भावना दिसून येत आहे अशी प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे.

## अमर नाईकवाडे सारखा

क्वॉलिटी तोच राजा होईल असे म्हणाले, तसेच त्यांनी निवडणुकीच्या काळात कामे करणाऱ्या उमेदवारांच्या मागे मतदारांनी उभे राहावे असे सांगितले आणि नगरपरिषद निवडणुकीत विजय होणार असा विशास व्यक्त केला. यावेळी बोलताना त्यांनी अमर नाईकवाडे, विनोद मुळूक, जयश्री विधाते असे अनेक चांगल काम करणारे चेहरे बीडमध्ये आहेत असे सांगितले, तर प्रभाग ३ मध्ये निवडणूक लढवत असलेले अमर नाईकवाडे हे चांगले काम करणारे नेतृत्व आहे. तर त्यांच्या समोर असलेले उमेदवार अमृत सारडा हे ही मनाने आणि धनाने मोठे आहेत. अशा मोठ्या माणसांनी विधानसभा,लोकसभा लढवावी आणि स्थानिक साठी अमर नाईकवाडे यांच्यासारख्यांना सोडावेत, येथे अमर नाईकवाडे हे फीट बसतात. असे माणसं जर निवडणुकीत पडले तर लोकांमध्ये चुकीचा संदेश जाईल आणि राजकारणार चांगली प्रमाणीकपणे काम करणारी माणसं येणार नाहीत असे ही विधाते म्हणाले आहेत.

## अलहुदा उर्दू शाळेच्या

सोसायटी द्वारा संचलित असून, बीड शहरातील एक नामांकित उर्दू प्राथमिक शाळा आहे. मागील अनेक वर्षापासून शिक्षक विरुद्ध मुख्याध्यापक व संस्थे मध्ये न्याय हक्कासाठी लढा सुरू होता. वरील या प्रकरणात शाळेचे मुख्याध्यापक मोमीन अब्दुल जफर अब्दुल अजीज यांनी फिर्यादी म्हणून शाळेच्या तीन शिक्षक सय्यद मोहम्मद नदीम, कादरी परवेज, आणि मिर्झा शारेख बेग यांच्याविरुद्ध बीड शहर पोलीस स्टेशन येथे डिसेंबर २०१५ मध्ये गुन्हा नोंदवला होता. तक्रारीत तिन्ही सहशिक्षकांना आरोपी ठरवण्यात आले होते.

५ डिसेंबर २०२५ रोजी जिल्हा व सत्र न्यायालयाचे प्रधान न्यायाधीश मा.यावलकर साहेबांनी निकाल देताना, फिर्यादीकडून कोणतेही ठोस पुरावे सिद्ध न झाल्याने तिन्ही शिक्षकांची निर्दोष मुक्तता जाहीर केली.

या प्रकरणात फिर्यादींची बाजू ॲड. एस. व्ही. सुलाखे यांनी मांडली. आरोपी पैकी मोहम्मद नदीम व कादरी परवेज यांची बाजू ॲड. मंगेश पोकळे , तर मिर्झा शारेख बेग यांची बाजू ॲड. भीमराव चव्हाण यांनी युक्तिवादातून प्रभावीपणे सिद्ध केली.या दोन्ही बचाव पक्षाच्या वकिलांनी पुरावे, साक्षी आणि घटनाक्रमाचे बारकाईने विश्लेषण करून न्यायालयासमोर वस्तुस्थिती स्पष्ट केल्यानेच आरोपी शिक्षकांना न्याय मिळवून देण्यात निर्णायक भूमिका बजावली.शाळेतील अंतर्गत वाद-विवादातून हा बनावट गुन्हा उभारण्यात आला असल्याचे बचाव पक्षाने न्यायालयात स्पष्ट केले. त्यांच्या संयमित, कायदेशीर ठोस मांडणीचे आणि युक्तिवाद चे कोर्टात विशेष कौतुक होत आहे.

शेवटच्या दशकभरात खाजगी शिक्षण संस्थांमधील, अन्याय, वाद आणि अंतर्गत संघर्ष ही नेहमीची समस्या बनली आहे. या पार्श्वभूमीवर, बनावट गुन्हा नोंदवण्यामध्ये काही संस्थात्मक घटकांनीही सहकार्य केले होते, अशी माहिती समोर आली. या सर्व अडचणींवर मात करत तिन्ही शिक्षकांनी न्यायालयात आपली बाजू ठामपणे मांडून शेवटी हा खटला जिंकला.या निकालामुळे शिक्षकांच्या दहा वर्षांच्या संघर्षाला न्याय मिळाला असून, सत्य आणि प्रामाणिकपणाचा विजय झाल्याची भावना शिक्षकांकडून व्यक्त केली जात आहे. खरंच आहे, सत्य परेशान हो सकता है, मगर पराजित नहीं!

## दोन आमदारांच्या

जाणार आहे. यामुळे शेतकऱ्यांना त्यांचा माल बाजारपेठेत नेणे सोपे जाईल. येत्या अर्थसंकल्पात तरतूद केली जाणार आहे.महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शुक्रवारी विधानसभेत ही घोषणा केली. पावसाळी अधिवेशनात या योजनेवर चर्चा झाली होती. तेव्हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बावनकुळे यांच्यावर योजनेचा आराखडा, तयार करण्याची जबाबदारी दिली होती.जुलै २०२५ च्या सुरुवातीपासून आमदार पडळकर आणि आव्हाड यांच्यात शरद पवार, सुप्रिया सुळेंवरील टीकेमुळे वाद धुमसत होता. पडळकरांना उद्देशून आव्हाड 'मंगळसूत्र' चोर असे ओरडत होते. पडळकर आव्हाडांना अर्बन नक्षल, मुसलमानांचा एक्स असे म्हणत होते. त्यावरून त्यांच्यात शाब्दिक चकमक होऊन त्याचे पर्यावसान १७ जुलैला कार्यकर्त्यांच्या हाणामारीत झाले. यात टकले, देशमुखांशिवाय दोन्ही बाजूंचे आठ-दहा कार्यकर्ते होते. घटनेनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केल्यावर पडळकरांनी विधानसभेत दिलगिरी व्यक्त केली होती.

## चालक बचावला

सकाळी ते आपल्या नातेवाईकांसह गंगाखेड येथील एका लग्नसमारंभासाठी गेले होते. दुपारी लग्न आटोपून परत येण्यासाठी गंगाखेड बसस्थानकासमोर त्यांनी परळीकडे जाणाऱ्या ऑटोरिक्षात जागा पकडली. दुपारी सुमारे अडीच वाजण्याच्या सुमारास गंगाखेडजवळच निळा पाटीजवळ हा ऑटोरिक्षा अचानक उलटला. ऑटोरिक्षामध्ये चालकासह एकूण दहा प्रवासी होते.

चालकाच्या शेजारी बसलेले बबनराव राऊत यांना रिक्षा उलटल्याने हँडलचा जोरदार मार लागला आणि त्यातच त्यांचा मृत्यू झाला. इतर प्रवाशांना किरकोळ दुखापत झाली आहे. हा अपघात होताच रिक्षा चालक तातडीने घटनास्थळावरून पसार झाला. बबनराव राऊत हे राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे परळीतील नगरसेवक पदाचे उमेदवार श्रीनिवास राऊत यांचे वडील होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा आणि दोन मुली असा मोठा परिवार आहे. उपजिल्हा रुग्णालय, परळी येथे त्यांच्यावर शवविच्छेदन करण्यात आले. नातेवाईकांच्या लग्नाच्या आनंदाच्या दिवशीच कुटुंबातील कर्त्या पुरुषाचा झालेला हा दुर्दैवी अंत परळी शहराला हळहळ लावणारा ठरला आहे.